स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्य विद्याशाखेतील समाजशास्त्र विषयातील पीएच्.डी

पदवीसाठी सादर केल्या जाणाऱ्या शोधप्रबंधाचा आराखडा

संशोधन विषय

ग्रामीण भागातील महिला सक्षमिकरणामध्ये महिला बचत गटाचे योगदान :एक समाजशास्त्रीय अभ्यास (विशेष-संदर्भ उस्मानाबाद जिल्हा)

संशोधक

श्री. विरभद्रेश्वर सामलिंग स्वामी

एम.ए., बी.एड., एम. फिल., सेट.

मार्गदर्शक

प्रा. डॉ. चंद्रशेखर एस. पाटील

एम. ए., बी.एड., पीएच. डी.

समाजशास्त्र विभाग, पंडीत दीनदयाल उपाध्याय महाविद्यालय, देवणी, जि. लातूर

संशोधन केंद्र

महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर

ग्रामीण भागातील महिला सक्षमिकरणामध्ये महिला बचत गटाचे योगदान :एक समाजशास्त्रीय अभ्यास

(विशेष-संदर्भ उस्मानाबाद जिल्हा)

प्रस्तावना(Introduction):

समाजामध्ये महिलांना मान, सन्मान, प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी आज समाजामध्ये त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा या उद्देशाने शासनाने महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनविण्यासाठी महाराष्ट्रामध्ये महिला स्वयंहाय्यता बचत गट, सावित्रीबाई फुले बहुउद्देशीय महिला केंद्र, कामधेनू योजना, देवदासी प्रतिबंधक कायदा इ. महिलांच्या सबलीकरणाचे अनेक उपक्रम राज्याने राबवले आहेत. त्यामध्ये सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे महिला स्वयंसाहाय्यता बचत गट, समाजामध्ये ही एक मोठी संस्था नावारूपास आली आहे. त्यामुळे महिलांचे समाजातील स्थान उंचावण्यास मदत होते.

भारताच्या लोकसंख्येचा आढावा घेतला असता ५० टक्के महिलांची संख्या आहे. पंरतु पुरूषांप्रमाणे त्यांचे स्थान दिसत नाही. त्यांना जोपर्यंत आर्थिक सामाजिक व राजकीय प्रक्रियेत सामावून घेतले जात नाही तो पर्यंत स्त्रियांच्या विकासाला गती मिळणार नाही. ग्रामीण महिला तर याबाबत खुपच मागे आहेत. त्यांच्या आर्थिक परावलंबित्व मोठ्या प्रमाणात दिसून येते. निरक्षरता, दारिद्र्य, बेकारी, अनिष्ठ रूढी, परंपरा व अंध:श्रध्देच्या चक्रव्यूव्हात महिला आडकलेल्या दिसून येतात. त्यातून बाहेर पडण्यासाठी त्या प्रयत्न करत आहेत. महिलांच्या सबलीकरणासाठी शासन व संस्था पातळीवर सातत्याने प्रयत्न होत आहेत. महाराष्ट्र शासनाचा एक अंगीकृत उपक्रम म्हणुन २५ फेब्रुबारी १९७५ ला स्थापन झालेल्या महिला आर्थिक विकास महामंडळ या संस्थेने २००१ पासून महाराष्ट्रात प्रत्यक्ष कार्याला सुरूवात केली. एप्रिल २००२ मध्ये प्रत्येक जिल्ह्यात महिला आर्थिक विकास महामंडळाने कार्यात सहभागी व्हावे यासाठी प्रयत्न केले.

२० वे शतक महिलांच्या उन्नतीसाठी महत्वाचे ठरले. आंतरराष्ट्रीय संयुक्त राष्ट्रसंघाचे (U.N.O.) १९७५ हे वर्ष महिला वर्ष म्हणून तर १९७५ ते १९८५ महिला दशक म्हणुन पाळण्यात आले आहे. याच काळात महिला सबलीकरण या संकल्पनेत मोठ्या प्रमाणावर चालना मिळाली आहे. बचत गटाची प्रथम सुरूवात बांगलादेश मध्ये महमद युनूस यांनी केली. त्यांना त्याच्या कार्याबद्दल २००६ साली शांततेचा नोबल पुरस्कार प्रदान करण्यात आला. भारतामध्ये इला भट्ट या महिलेने भारतात १९७७ साली ग्रामीण बँकेची सुरूवात केली होती. त्याच्या कार्याबद्दल त्यांना भारत सरकारने पद्मभुषण पुरस्कार देवून गौरवले त्यांनी अनेक महिलांच्या चळवळी उभ्या केल्या. त्यामुळे महमद युनूस यांच्या प्रमाणे इला भट्ट यांचे ही नांव बचट गट चळवळीशी जोडले गेले आहे.

स्त्रीत्वाचा सन्मानार्थ संपूर्ण जगभरात ८ मार्च हा दिवस जागतिक महिला दिन म्हणुन साजरा केला जातो. याचा मुख्य उद्देश महिलांप्रती जिव्हाळा, आदर, करण्याबरोबरच त्यांची आर्थिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रात केलेले उल्लेखनीय कामगिरीला प्रोत्साहन देणे होय. स्त्री हा समाजाचा आधारस्तंभ असुन त्याचे संरक्षण व जपणूक करण्याची जबाबदारी ही समाजाची आहे. निरोगी व सुसंस्कृत समाज निर्माण करण्यासाठी महिलांचे योगदान महत्वाचे आहे.

महिला सबलीकरणाचा वेग वाढला आहे. त्यामुळे महिलांचा विकास होत आहे. महिलांना राजकीय, सामाजिक, आर्थिक क्षेत्रात सहभागी करून घेतले जात आहे. फक्त चुल आणि मुल यापुरते मर्यादित न राहता आता महिलांनी जागतिकीकरणामुळे शिक्षण, आरोग्य, प्रशासनात व माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातही उत्तुंग भरारी घेतली आहे. महिलांचा विकास व्हावा या उद्देशाने १९९४ रोजी पहिले शिक्षण धोरण जाहीर केले गेले. तसेच ७ मार्च २००१ रोजी नव्या धोरणाला मान्यता देवून महिलांचे सबलीकरण विकास, आरक्षणात वाढ, संरक्षण या बाबींचा विचार केला गेला. तसेच हे वर्ष भारताने महिला सबलीकरण वर्ष म्हणुन साजरे केले आणि महिलांच्या हितासाठी विविध उपक्रम राबवून महिला कायद्यातील दुरूस्ती व तरतुदी करण्यात आल्या.

बचत गट मोठ्या प्रमाणात ग्रामीण भागामध्ये दिसून येतात. ग्रामीण महिलांमध्ये सामाजिक, आर्थिक व राजकीय बदल घडवून आणण्यासाठी बचत गटाचा उपयोग किती प्रमाणात होत आहे. याचा अभ्यास प्रस्तुत प्रबंधात करण्यात आला आहे. बचत गटामुळे ग्रामीण महिलांच्या वैयक्तीक, सामाजिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक व राजकीय बदल किती प्रमाणात होत आहे. यांचा अभ्यास करण्याचे ठरवले असून प्रस्तुत प्रबंधात उस्मानाबाद जिल्ह्यात ग्रामीण भागातील महिला सक्षमीकरणामध्ये बचत गटाचे भूमिका व योगदान याचा अभ्यास सदर संशोधनात दाखविण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

संशोधन विषयाचे महत्व व उपयोगिता(Scope of Research):

संशोधन शब्दाचा अर्थ समाजशास्त्रात व्यापकतेने वापरला जातो सामाजिक जीवनात एखादी घटना का घडली त्यामध्ये कारण काय, ती घटना कशी घडली हे शोधून काढण्याकरिता संशोधनाचा उपयोग केला जातो. व्यक्तीच्या बुद्धीला चालना देण्यासाठी व्यवहारिक प्रश्नांची कारणे शोधण्यासाठी संशोधन केले जाते.

जीवनामध्ये संशोधनाचे महत्व हे दिवसेंदिवस वाढत चालेले आहे. कारण मानवी जीवनात अनेक घटना घडतात त्या घटना का घडल्या हे संशोधनाद्वारे शोधून काढल्याने व्यक्ती व समाजाच्या ज्ञानात भर टाकणे हा संशोधनाचा प्रमुख हेतू असतो. उस्मानाबाद जिल्हा १ नोव्हेंबर १९५६ रोजी हैद्राबाद राज्यातून

मुबंई राज्यात आला. उस्मानाबाद जिल्हा महाराष्ट्र राज्यात आग्नेय दिशेस आहे. १७.३५ ते १८.४० उत्तर व ७५.१६ ते ७६.४० पुर्व दशांश असा आहे.

उस्मानाबाद जिल्ह्यास एकूण चार जिल्हे व एक राज्याची सीमा संलग्न आहे. उस्मानाबाद जिल्ह्याच्या पूर्वेस लातूर, पश्चिमेस सोलापूर, दक्षिणेस सोलापूर जिल्ह्याचा काही भाग व कर्नाटक राज्याची सीमा आहे. उत्तरेस बीड जिल्हा व वायव्येस अहमदनगर जिल्ह्याची सिमा आहेत. उस्मानाबाद जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ ७५६९ चौ.कि.मी. आहे. उस्मानाबाद जिल्ह्याची लोकसंख्या १६,५७,५७६इतकी आहे. लोकसंख्येची घनता १६९ प्रति चौ.कि.मी. आहे. ग्रामीण भागातील लोकांची उपजिविका शेतीवर अवलंबून आहे. पावसाचे प्रमाण मराठवाड्यात उस्मानाबाद जिल्ह्यात कमी आहे.

उस्मानाबाद जिल्ह्याचे साक्षरतेचे प्रमाण ७०.२४% इतके असून स्त्री साक्षरतेचे प्रमाण ५७.५५% इतके आहे. पुरूष साक्षरतेचे प्रमाण ८२.०३% इतके आहे. नागरी लोकसंख्या ही १५.८४ आहे. ग्रामीण लोकसंख्या ८४.१६ टक्के आहे. स्त्री पुरूषाचे प्रमाण १०००: ९३० इतके आहे.

उस्मानाबाद जिल्हा आई तुळजाभवानीचा जिल्हा म्हणुन ओळखला जातो. या जिल्ह्यात उद्योग धंद्याच्या अभाव, कृषी वरती अवलंबित्व, दरडोई उत्पन्न कमी साक्षरतेचे प्रमाण कमी विशेषतः स्त्री साक्षरतेचे प्रमाण फारच कमी तंत्र शिक्षणाच्या सुविधाची कमतरता व्यावसायिक कुशलतेचा अभाव, सहकारी संस्था क्षीण, स्वयंसेवी संस्थाचा अभाव इ. कारणामुळे हा जिल्हा मागासलेला आहे. म्हणुन महिला सक्षमीकरणात महिला बचत गट काही बदल घडवून आणू शकतो काय? महिलांतील आरोग्य विषयक जाणीव, स्वयंरोजगार, समूह प्रेरणा, समूहशक्ती राजकीय जागृती, शिक्षण, नेतृत्वाची संधी, आत्मसन्मानाची भावना वाढीस लावल्यास बचत गट कितपत मदत करतो आहे. याचा शोध घेण्याच्या दृष्टीने प्रस्तुत विषयाची अध्ययनासाठी निवड केली आहे. अशाप्रकारे सदर संशोधनाचे महत्व असून त्याची उपयोगिता खालील प्रमाणे असल्याची दिसते.

१. महिला सक्षमीकरण आजच्या काळात किती उपयुक्त आहे हे लक्षात आणता येईल.

२. बचत गटाच्या कार्यामुळे महिलांमध्ये स्वयंपुर्णतेची जाणीव कशी निर्माण झाली यांची माहिती करून घेता येईल.

३. ग्रामीण भागातील महिलांच्या जीवनामध्ये बचत गटामुळे झालेल्या परिवर्तनाची माहिती करून घेता येईल.

४. शासनाच्या विविध योजना बचत गटामार्फत चालू केल्यामुळे बचत गटातील महिलांना विविध रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्याची माहिती करून घेण्यात येणार आहे.

बचत गटाची संकल्पनाः

"ज्यात प्रामुख्याने समान प्रश्न सारखे आचार विचार समाज मत आणि परस्पर जवळीक असणारे लोक स्त्री किंवा पुरूष एकत्र येतात व बचतीच्या माध्यमातून आपल्या छोट्यामोठ्या आर्थिक गरजा भागवून आपला सर्वांगीण विकास करतात त्यास बचत गट म्हणतात."

महिला सक्षमीकरणाची संकल्पनाः

" महिलांचे सक्षमीकरण म्हणजे स्त्री सक्षमीकरण. म्हणजेच स्त्री सक्षमीकरणाचा अर्थ असा की, स्त्री ने स्वतःच्या क्षमतांचा विकास करायचा व स्वतःवर परिणाम करणा-या घरगुती व सामाजिक निर्णयांच्या प्रक्रियेत सहभागी होण्याचा प्रयत्न करायचा व जीवनाच्या सर्व क्षेत्रात तिला प्राप्त होवु शकणा-या सर्व शक्तीची ओळख करून घेण्याचा प्रयत्न होय."

संशोधनाचे उद्दिष्टेः (Objectiv of Research)

प्रस्तुत संशोधनात संशोधकांनी पुढील हेतू व उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवले आहेत.

१. उस्मानाबाद जिल्ह्यातील ग्रामीण भागातील महिलांच्या कौटुंबिक पार्श्वभूमीचा अभ्यास करणे.

२. उस्मानाबाद जिल्ह्यातील ग्रामीण भागातील महिला बचत गटात सहभागी असणाऱ्या महिलांचा सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व राजकीय स्थितीचा अभ्यास करणे.

३. उस्मानाबाद जिल्ह्यातील ग्रामीण महिला बचत गटामार्फत महिलांचा उद्योजकता विकास कितपत झाला याचा शोध घेणे.

४. उस्मानाबाद जिल्ह्यातील ग्रामीण भागातील महिला बचत गटाची महिला सक्षमीकरणाची भूमीका अभ्यासणे.

५. उस्मानाबाद जिल्ह्यातील ग्रामीण भागातील महिला बचत गटाच्या यश अपयशाचे कारणे शोधणे व बचत गटाला शासनाचे मदत करण्याचे धोरण अभ्यासणे.

६. उस्मानाबाद जिल्ह्यातील ग्रामीण भागातील महिला बचत गटाच्या महिलासमोर असणाऱ्या समस्यांचा अभ्यास करून उपाय योजना सुचविणे.

संशोधनाचे गृहितकेः (Hypothesis)

सामाजिक संशोधनामध्ये गृहितकृत्यांचे विशेष महत्व आहे. गृहितकृत्ये हे संशोधनात दिवसाप्रमाणे मार्गदर्शन करतात. संशोधनात वैज्ञानिक पद्धतीने एखाद्या विषयाचे अध्ययन करायचे असल्यास प्रथम त्या विषयासंबंधी पुर्व ज्ञान असावे लागते. यापूर्वी ज्ञानाच्या आधारे संशोधक सामान्य अनुमान काढतो. या अनुमानास गृहितकृत्ये म्हणतात.

१. महिलांची कौटुंबिक आर्थिक स्थिती बळकट झालेली आहे.

२. बचत गटात काम करणाऱ्या महिलांची आर्थिक व सामाजिक स्थिती सुधारलेली आहे.

३. शासकीय योजनामुळे तसेच बचत गटामुळे महिलांची वैयक्तीक पातळी उंचावण्याबरोबरच कुटूंबाचा आधार बनल्या आहेत.

४. सुशिक्षीत महिला बचत गटात इतर बचत गटांपेक्षा वेगळा दृष्टीकोन आहे.

५. महिला बचत गटामुळे महिलांना राजकारणामध्ये मानाचे स्थान मिळाले आहे.

संशोधन पद्धती: (Research Methodlogy)

प्रस्तुत संशोधनासाठी अन्वेषणात्मक, विश्लेषनात्मक, वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे. तसेच सांख्यिकीय पद्धतीचा संकलीत केलेल्या माहितीवर प्रक्रीया करण्यासाठी वापर करण्यात येणार आहे.

नमूना निवडः (Sampling)

प्रस्तुत संशोधनामध्ये नमुना निवडीच्या प्रकारात गैरसंभाव्यता नमुना निवड अंतर्गत सहहेतूक नमुना निवड पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे. उस्मानाबाद जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील (आठ तालूके) १५ महिला बचत गटाची नमुना म्हणून निवड करणार आहे. गावे व लोकसंख्या व बचत गटाच्या कार्याचा आधार लक्षात घेऊन १००० लोकसंख्येपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या गावाची निवड करण्यात येणार आहे. ज्या बचत गटाचे कार्य आज ही सुरळीतरित्या चालू आहे अशा गावातील महिला बचत गटाचा अभ्यास केला जाणार आहे. ही निवड साधा यादृच्छिक नमूना निवड पद्धतीतील लॉटरी पध्दतीने प्रत्येक बचत गटातील दोन उत्तरदात्यांची नमुना निवडीत निवड केली जाणार आहे.

तथ्य संकलनः (Data collection)

अ) प्राथमिक स्त्रोतः

प्रस्तुत संशोधनात महिला सक्षमीकरणामध्ये ग्रामीण भागातील महिला बचत गटाची भूमिका हा विषय असल्यामुळे प्रत्यक्ष अभ्यास महत्वाचा आहे. त्यामुळे तथ्य संकलनासाठी प्राथमिक स्त्रोताच्या माध्यमातून मुलाखत, अनुसूची, तंत्राचा वापर करण्याचे ठरवले आहे.

ब) दुय्यम स्त्रोतः

प्रस्तुत संशोधनात द्वितीय स्त्रोताअंतर्गत अध्ययन विषयाशी संबंधित असणारे सरकारी पत्रिका, प्रकशित अप्रकाशित संदर्भ ग्रंथ, वर्तमानपत्रे, मासिके व महिला आर्थिक विकास महामंडळ उस्मानाबाद यांच्याकडील उपलब्ध असलेल्या छापील स्वरूपातील माहिती, शासकीय व निमशासकीय माहिती, प्रकाशित व अप्रकाशिकत दस्ताऐवज,पीएच.डी, एम. फील, संदर्भ ग्रंथ, इंटरनेट इ. बाबींचा तथ्य संकलन करण्यासाठी उपयोग करण्यात येईल.

तथ्य विश्लेषणः (Data analysis)

संशोधक वेगवेगळ्या तथ्यांच्या आधारे तथ्य संकलन करतो. अशा विश्लेषणाच्या आधारे गुणात्मक, तथ्याचे सांख्यिकीय व वस्तुनिष्ठ तथ्यात रुपांतर केले जाते असे विश्लेषणानंतर निष्कर्ष काढले जातात.

प्रस्तुत संशोधनात तथ्यांचे संघटन करण्यासाठी तथ्यांच्या गुणधर्मानुसार विभाजन करण्यात येईल अशा विश्लेषणाशिवाय तथ्याला अर्थपूर्णता प्राप्त होणार नाही. म्हणुन प्रस्तुत संशोधनात अशय विश्लेषणाचा उपयोग केला जाईल.

अभ्यास क्षेत्रः (Area of Study)

प्रस्तुत संशोधक प्रबंधासाठी उस्मानाबाद जिल्ह्याची निवड करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्यातील मराठवाडा विभागातील उस्मानाबाद जिल्हा आहे. या जिल्ह्यात उस्मानाबाद, तुळजापूर, भूम, कळंब, वाशी, लोहारा,उमरगा, परंडा या आठ तालुक्याचा समावेश होतो. जिल्ह्याचे क्षेत्रफळ ७७७४ चौ.की.मी. आहे. जिल्ह्याची लोकसंख्या १६,५७,५७६ इतकी आहे. जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील ग्रामीण भागातील १५ गावातील ४० महिला बचत गटापैकी भिन्न भिन्न व्यवसाय करणाऱ्या १५ महिला बचत गटाची निवड अभ्यासाचे क्षेत्र म्हणुन करणार आहे.

संशोधनाची मर्यादा (Limitation of Research) :

प्रस्तुत संशोधनात महिला सक्षमीकरणामध्ये ग्रामीण भागातील महिला बचत गटाचे योगदान एक समाजशास्त्रीय अभ्यास करण्यात येणार असून प्रस्तुत संशोधन विषय हा उस्मानाबाद जिल्ह्यापुरताच मर्यादीत आहे.

प्रकरणांची रुपरेषाः

प्रकरण पहिलेः प्रस्तावना

प्रस्तुत प्रकरणामध्ये महिलां सक्षमीकरणाची संकल्पना, महिला सक्षमीकरणाची आवश्यकता,स्वरुप, उदिष्टे,भारतातील व महाराष्ट्रातील महिलांच्या विकासाच्या वाटचालीची ऐतिहासीक पार्श्वभूमी व महिला सक्षमीकरणात बचत गटाचे योगदानाविषयी अध्ययन विषयाच्या साहित्याचा मागोवा घेण्यात येणार आहे.

प्रकरण दुसरेः संशोधन पद्धती

या प्रकरणात संशोधन विषयाशी संबधीत बाबीची मांडणी करण्यात येणार आहे. संशोधन अभ्यासचे महत्व संशोधनाचा अभ्यास विषय, अध्ययन क्षेत्र, संशोधनाची उद्दीष्टे, गृहीतके, नमुना निवड पद्धत, संशोधनाची तंत्र, तथ्य विश्लेषन, सांकेतीकरण, सारणीकरण, आलेख, संशोधनाची मर्यादा इ.चा समवेश या प्रकरणत करण्यात येणार आहे.

प्रकरण तिसरेः बचत गटातील महिलांची सामाजिक, आर्थिक, राजकीय व शैक्षणिक स्थिती

प्रस्तुत प्रकरणामध्ये मुलाखत व अनुसूचीच्या माहितीच्या आधारे महिला बचत गटातील महिलांची सामाजिक,आर्थिक,राजकीय व शैक्षणिक स्थिती विषयीचे अध्यन करण्यात येणार आहे.

प्रकरण चौथेः महिला बचत गटाची सक्षमीकरणातील भुमिका व योगदान

प्रस्तुत प्रकरणामध्ये विविध प्रकारचे संदर्भ ग्रंथ, मुलाखत, अनुसूची व द्वितीय तथ्य संकलन साहित्य यांच्या माहितीच्या आधारे महिला बचत गटाची सक्षमीकरणातील भूमिका व योगदान यांचे आध्यन करण्यात येणार आहे.

प्रकरण पाचवेः निष्कर्ष शिफारशी

प्रस्तुत संशोधनासाठी गृहीत कृत्याची पडताळणी करून त्यांची सत्यता व असत्यता तपासण्यात येणार असून संशोधनाच्या निष्कर्ष व शिफारशी यांची मांडणी करण्यात येणार आहे.

नोट : वरील संशोधन आराखडा स्थूल स्वरुपाचा असून प्रत्यक्ष संशोधन कार्य करतेवेळेस त्यात बदल होण्याची शक्यता आहे.

संदर्भ सूचीः

१. डॉ. वैशाली पवार, २०१२, महिलांच्या सामाजिक संघर्षाचा आलेख, डायमंड पब्लिकेश, पुणे.

२. श्रीमती.प्रमिला दाधीच, २००९, आधुनिक समाज कार्यातील महिलांचे, पार्क पब्लिकेशन जयपूर.

३. कमलेशकुमार गुप्ता, २००५, महिला सक्षमिकरण, बुक जयपूर.

४. डॉ. सौ. नंदिनी तडकल्ला, २००८, महिलांचे सबलिकरण आणि शेतकरी महिला आघाडीचे योगदान.

५. डॉ. श्रीकांत गायकवाड, २००९ भारतातील सामाजिक चळवळी, अरूणा प्रकाशन, लातूर.

६. श्री. गुलाबराव ठाकरे, २००६ बचतगट एका वरदान, मे. आदर्श विकास प्रकाशन, पुणे

७. डॉ. स्वामी कर्वे २००३ स्त्री शिक्षणाच्या पाऊल खुणा, प्रतिमा प्रकाशन, पुणे.

८. डॉ. शुभांगी गोरे गव्हाणे, २००४, महिला सबलिकरण स्वरूप व समस्या, वाद पब्लिकेशन, औरंगाबाद.

९. प्रा. विजय कुलकर्णी, २०००, बचतनामा, चैतन्य प्रकाशन

१०.डॉ. देसाई संभाजी, महिला सबलिकरण, प्रशांत पब्लिकेशन.

११. भांडारकर पु.ल., १९८७, सामाजिक संशोधन पद्धती, नागपूर महाराष्ट्र विद्यापीठ ग्रथ निर्मिती मंडळ.

१२. डॉ. आगलावे प्रदिप, २०००, सामाजिक संशोधन पद्धती शास्त्र व तंत्र नागपूर, विद्या प्रकाशन.

१३. काटोले रविंद्र, २००७, महिला बचत गट पुणे गोडवा कृषी प्रकाशन.

१४. डॉ. अरुधंती पाटील २०१२, स्त्रीः आत्मभान ते सबलीकरण एक प्रवास, अरूणा प्रकाशन, लातूर.

१५. लोकराज्य डिसेंबर, २००८ महाराष्ट्र शासन निर्मिती, मुंबई.

१६ गायकवाड उमाकांत, २०११, उस्मानाबाद जिल्हा विशेष, उस्मानाबाद.

१७. पाटील विद्या/ खंदारे व्हि.बी., बचत गटातील महिला सक्षमीकरण.

१८. मुलाणी एम.यु., महिला स्वयंसहय्यता बचत गट रसिक साहित्य प्रा. लि.

१९. चौधरी राजेश, महिला बचत ,गट रसिक साहित्य प्रा. लि.नाशिक.

२०.डॉ.आशुराणी, १९९७, महिला विकास कार्यक्रम, इना श्री पब्लिशर्स, जयपूर.

२१. पाटील मनोज, २०१२, नागरिकांसाठी केंद्र व राज्य शासनाच्या विकास योजना, चौधरी लॉ पब्लिशर्स,जळगांव.

२२. श्रीमती कच्छल मन्यू व श्रीमती जैव शशी, १९९८, उन्निसवी शताब्दी में सामाजिक परिवर्तन, पॉईटर पब्लिशर्स, जयपूर.

२३. मिल जॉन स्टुअर्ट, २००२ स्त्रीयों की पराधिनता, राजकमल विश्व, दिल्ली.

24. Dutta R. K., 2003, Women Empowerment,

Public Reference Press, New Delhi.

25. Jagdish Singh Nandar, 2009, 101 Great Daughters of India Who Shaped, B. Adyan and Nath the Word Robins Books, New Delhi.

26. Mourya S.P., 1998, Women in India, Chagh Publishing, Allahabad, India.

27. आग्निहोत्री ए. एन., २००८ महिला सशक्तीकरण और कानून, सरस्वती प्रकाशन, कानपूर.

संशोधक

श्री. स्वामी विरभद्रेश्वर सामलिंग
एम.ए., बी.एड., एम. फिल., सेट.
मु.पो. जळकोट ता. तुळजापूर
जि. उस्मानाबाद.

संशोधक मार्गदर्शक

प्रा.डॉ. चंद्रशेखर एस. पाटील
एम. ए. बी. एड., पीएच्.डी.
समाजशास्त्र विभाग, पंडीत दीनदयाल उपाध्याय महाविद्यालय,
देवणी, जि. लातूर